जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 JUL 2021
लोकमत

# एमबीए प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची १७ जुलै अंतिम मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एमबीएसाठी डीटीई या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यास सुरुवात झाली असून, १७ जुलै ही अंतिम तारीख आहे. या परीक्षेवरच प्रवेश निश्चित होत असल्याने पालक व विद्यार्थ्यांनी तातडीने अर्ज करून शैक्षणिक व आर्थिक नुकसान टाळावे, असे आवाहन केआयटी कॉलेजने केले आहे. कोरोनामुळे प्रवेश प्रक्रियेबाबत बरेच जण अनभिज्ञ आहेत. त्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी केआयटीतील आयएमईआयचे संचालक डॉ. सुजय खाडिलकर व प्रा. डॉ. प्रवीण जाधव यांनी पुढाकार घेत यासाठी जनजागृती सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी पत्रकार बैठक घेऊन माहिती दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन पद्धतीने प्रवेश अर्ज भरून घेतले जात आहेत. २२ जूनपासून ही प्रक्रिया सुरू झाली असून १७ जुलैपर्यंत चालणार आहे. त्यामुळे पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेस बसलेले किंवा पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थीही एमबीएची प्रवेश प्रक्रिया देऊ शकतात. राज्यभर एकसमान प्रक्रिया राबवली जात आहे. प्रवेश प्रक्रिया दिली तरच आरक्षणनिहाय विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत मिळणार असल्याने तत्काळ अर्ज करावेत.

01 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘पदव्युत्तर’च्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. २३ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. विद्यापीठाने ठरवून केंद्रावर ऑनलाईन परीक्षा होणार आहेत.

शैक्षणिक २०२१-२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षांची अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एम.ए., एम.एस्सी.-भूगोल, एम.एस्सी. सर्व विषय, एम.सी.ए.सायन्स, बी.लिब. अँड इन्फॉर्मेशन सायन्स, बीजे., एमजे., मास कम्युनिकेशन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अंतर्गत येणारे अभ्यासक्रम, एम.ए.- रशियन भाषा, एम.ए. इन वुमेन स्टडीज, एम.ए., एमबीए (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षा होणार आहेत. एम.ए., एम.कॉम.,एम.एस्सी.,मॅथस्, एम.आर.एस.,एलएलएम, एम.लिब अँड इन्फॉर्मेशन सायन्स, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा व सर्टिफिकेट कोर्सचे प्रवेश गुणवत्तेनुसार अधिविभागस्तरावर राबविले जाणार आहेत. एम.ए. डिस्टन्स मोडची माहिती संकेतस्थळावर दिली जाणार आहे. लवकरच ऑनलाईन वेबिनार घेण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# ऑनलाईन परीक्षांना प्रारंभ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षांना बुधवारपासून प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी ३९९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विविध अधिविभागांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा दि. २२ मार्च २०२१ पासून ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या.

पुनर्परीक्षा ऑनलाईन पद्धतीने दि. ३० जून २०२१ पासून घेण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार बुधवारी बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., एम.ए., एम. कॉम., बीबीए, बीडीईएस, जर्नालिझम आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा झाल्या. पहिल्या दिवशी एकूण ६६० विद्यार्थ्यांपैकी ३९९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

01 JUL 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पश्चिम घाटाच्या पोटात 'नवी' गोगलगाय!

## नव्या प्रजातीचा शोध; कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील संशोधनास आंतरराष्ट्रीय मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पश्चिम घाटात जगाला आजवर माहीत नसलेल्या गोगलगायीच्या एका प्रजातीचा शोध लागला आहे! सांगलीतील भूमिपुत्राच्या या संशोधनाची दखल 'जर्नल ऑफ टेक्सॉनॉमी' या जीवसृष्टीच्या वर्गीकरणाला वाहिलेल्या युरोपातील जगप्रसिद्ध विज्ञानविषयक प्रकाशनाने घेतली आहे. मऊ मुलायम शरीर आणि त्यावर टणक कवच धारण करणाऱ्या जमिनीवरील मृदुकाय/उदरपाद प्राण्यांच्या जागतिक यादीत आता पश्चिम घाटातील या गोगलगायीलाही मानाचे स्थान मिळाले आहे.

सांगलीचे प्रा. डॉ. अमृत भोसले (सध्या कराड येथील गाडगे महाराज कॉलेजमध्ये प्राणिशास्त्राचे सहायक प्राध्यापक)

- **सांगलीच्या प्रा. डॉ. भोसलेंची 'वरदिया'साठी आंबोलीत रात्रीची भटकंती**
- **माजी विद्यार्थी, डॉ. वरद गिरी यांच्या नावे प्रजातीचे नामकरण**
- **जगद्विख्यात 'युरोपियन जर्नल ऑफ टेक्सॉनॉमी'कडून संशोधनाला मंजुरी**



**आंबोली (सिंधुदुर्ग) : पश्चिम घाटात आढळलेली 'वरदिया आंबोलीएन्सीस' ही गोगलगायीची नवी प्रजाती.**

> 'वरदिया आंबोलीएन्सीस' ही गोगलगाय रात्रीच्या वेळी अधिक सक्रिय असते. त्यामुळे आंबोली परिसरात मला अनेकदा रात्रीची भटकंती करावी लागली.
>
> **- प्रा. डॉ. अमृत भोसले**, सांगली

यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली येथील हिरण्यकेशी नदी मंदिर परिसरात गोगलगायीच्या या नव्या प्रजातीचा शोध लावला. प्राणिशास्त्रासाठी आजवर अज्ञात असलेल्या गोगलगायीच्या या प्रजातीला 'वरदिया आंबोलीएन्सीस' असे नाव डॉ. भोसलेंनी दिले. डॉ. भोसले यांनी हे संशोधन कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठातील पीएच.डी.दरम्यान केले. याच विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तसेच सरिसृप वर्गातील ४ पोटजाती व तब्बल आतापर्यंत ५६ प्रजाती शोधून काढणारे डॉ. वरद गिरी यांना डॉ. भोसले यांनी आपले हे संशोधन वाहिलेले आहे. डॉ. वरद गिरी यांच्या नावावरूनच गोगलगायीच्या या नव्या पान २ वर

0 1 JUL 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पश्चिम घाटाच्या पोटात 'नवी' गोगलगाय!

(पान १ वरून)

प्रजातीचे नामकरण 'वरदिया आंबोलीएन्सीस' असे करण्यात आले. अन्य गोगलगायींच्या तुलनेत आकाराने 'वरदिया आंबोलीएन्सीस' ही गोगलगाय जरा मोठीच असते. प्रौढ गोगलगाय लांबीला ७ सेंटिमीटरपर्यंत भरते. भारतात आढळणाऱ्या अन्य गोगलगायींपेक्षा ही वेगळीच आहे. हिचे रूप वेगळे आहे. शंखाचा आकार (तुलनेत मोठा) आणि प्रकार वेगळा आहे. महत्त्वाचे म्हणजे, प्रजननाची पद्धतही वेगळी आहे. मृदुकाय समूहातील सर्व गोगलगायी उभयलिंगी आहेत. 'वरदिया आंबोलीएन्सीस'ही त्याला अपवाद नाही; पण लैंगिक रचनेपासून ते इतर अनेक बाबतींत या प्रजातीची प्रजनन प्रक्रिया अन्य गोगलगायींहून वेगळी आहे. संशोधनांतर्गत या गोगलगायीचा 'डीएनए सिक्वेन्सिंग डेटा'ही संकलित करण्यात आला. संशोधन ग्राह्य ठरण्यात या डेटाचा वाटा मोलाचा ठरला. गोगलगायीची ही प्रजाती जैवविज्ञानाला आजवर अज्ञात होती, हे या डेटाने सिद्ध झाले.

**तेजस ठाकरेंचाही सहभाग!**

लंडनच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियमचे डॉ. दिनार्झर्दे रहिम, नॉटिंगहॅम विद्यापीठाचे डॉ. ख्रिस्टोफर, व्हिएन्ना विद्यापीठाचे डॉ. अहमद सादी, ठाकरे वाईल्ड लाईफ फाऊंडेशनचे तेजस उद्धव ठाकरे (मुंबई), दक्षिण कोरियातील क्युंगपूक विद्यापीठाचे आसिफ तांबोळी, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील सुहास कदम आणि डॉ. डी. व्ही. मुळे यांचा या संशोधनात मोलाचा वाटा आहे.

### तीन राज्यांत 'वरदिया'चे अस्तित्व

- 'वरदिया आंबोलीएन्सीस' ही गोगलगाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोव्यातील काही भागांत अस्तित्वात आहे.
- नैसर्गिक अधिवासाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने 'वरदिया' गोगलगायीचे अस्तित्व धोक्यात आहे.

### गोगलगाय अन् पोटात पाय!

गोगलगाय हा 'उदरपाद' वर्गातील प्राणी म्हणूनच मराठीत 'गोगलगाय अन् पोटात पाय' ही म्हण रूढ झालेली आहे. गोगलगायींच्या जगभरात ३५ हजारांपर्यंत जाती आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 1 JUL 2021
तरूण भारत

# एमबीए प्रवेश परीक्षेसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर :** एमबीएला प्रवेश घेण्यासाठी डीटीईची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. या प्रवेश परीक्षेचा अर्ज भरण्यासाठी १७ जुलैपर्यंत मुदत आहे. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज भरावा, असे आवाहन केआयटी आयएमईआरचे संचालक डॉ. सुजय खाडिलकर यांनी केले आहे. मार्केटिंग, ह्यूमन रिसोर्स, फायनान्स अशा विषयांपैकी दोन विषय घेऊन एमबीए पूर्ण करू शकतात. शासनाची एमबीए प्रवेश परीक्षा दिल्यानंतर शासनाकडून प्रवेश शुल्कासह विविध सवलती मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी **www.mahacet.org** या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन केले आहे.

01 JUL 2021 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहितीची सत्यता पडताळणे महत्त्वाचे : सोनार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३० : माहिती स्रोताचे विश्लेषण आणि सत्यता पडताळणी, प्रभावी ऑनलाईन शोध कसा करावा, आदी विषयांवरील चचर्चासत्राने माहितीच्या सत्य पडताळणीविषयी दोनदिवसीय कार्यशाळेचा समारोप झाला. शिवाजी विद्यापीठाचा पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्यातर्फे गुगल मीटद्वारे ऑनलाइन पद्धतीने शिबिर झाले.

दिल्ली येथील मुक्त पत्रकार आणि गुगल न्यूज इनिशेटिव्हच्या प्रशिक्षक नुपूर सोनार यांनी कार्यशाळेत बातमीतील तथ्य तपासणी आणि पडताळणी या विषयावर सादरीकरणासह मार्गदर्शन केले. बुधवारी कार्यशाळेचा शेवटचा दिवस होता. चंद्रशेखर वानखेडे, डॉ सुमेधा साळुंखे यांनी प्रस्तावना केली. माहितीच्या सूत्रांची तथ्य पडताळणी, इन्टरनेटचा प्रभावी वापर, फेसबुक, ट्वीटर, युटुबवरील माहितीचे पडताळणी आणि विषयावर विवेचन झाले. नुपूर सोनार यांनी कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थी शिक्षक पत्रकार संशोधकांचा शंकांचे निरसन केले. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी आयोजन केले.

प्रा डॉ. शिवाजी जाधव, डॉ. साळुंखे, प्रा. वानखेडे यांनी विशेष साहाय्य केले. ९० जणांनी या शिबिरात सहभाग घेतला. निहारिक देशपांडे यांनी आभार मानले.